रजि. नं. : ई -६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**शिर्डी :** पोस्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : + ९१-२४२३ - २५८५०० फॅक्स : + ९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/वाहन/ 6899 /२०१८.
दि. 22 MAR 2018

प्रति,
--------------------------------
--------------------------------
--------------------------------

**विषयः- संस्थान वाहनांचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) नुतनीकरण करणे कामी दरपत्रक देणे बाबत....**

महोदय,

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ही एक धर्मादाय संस्थान आहे. संस्थानच्या अ) स्कुलबस-१३, ब) प्रवासीबस-११ व क) मालवाहतुक-१३ अशा एकुण ३७ वाहनांचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) दि.०१/०४/२०१८ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीत नुतनीकरण करणे कामी खालील अटी-शर्तीस अधिनराहुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**अटी-शर्ती:-**

१) संस्थानचे विविध ३७ वाहनांना रोज मरता कंपनीचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) फ्युअल टाईपचे बसविलेले आहेत.

२) सदरचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) विविध तारखांना बसविण्यात आलेले असलेने त्यांचे नुतनीकरणाच्या तारखा वेगवेगळया आहे.

३) सदर वाहनाचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) नुतनीकरणाचे काम संबंधीत वाहनाचे RTO पासींग तारखेच्या एक महिना अगोदर करुन द्यावे लागेल.

४) संस्थान वाहनाचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) ची प्रत्यक्ष तपासणी करुन त्या वाहनांचा RTO नियमानुसार वेग नियंत्रीत करुन देण्याचे काम वाहन विभागातच करावे लागेल.

५) संस्थान वाहनाचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) ची प्रत्यक्ष तपासणी करतांना वेग नियंत्रकाचे काही पार्ट खराब झाले असल्यास ते दुरुस्ती अथवा बदली करुन द्यावे लागतील.

६) सदरचे दर GST व इतर करांसहीत असावेत. दरपत्रकात नमुद केलेल्या दराव्यतिरीक्त अतिरीक्त कर अथवा ट्रान्सपोर्ट चार्जेस देय होणार नाही.

७) केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १२६ नुसार, वाहनांचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) प्रमापणपत्र RTO कार्यालयाकडून मान्यता मिळालेली असावीत.

८) सदर वाहनाचे आर.टी.ओ. पासींग करीता डॉक्युमेंटेशन तयार करुन द्यावे लागेल.

९) ज्याकोणाला श्री साईबाबांची सेवा म्हणुन कमी दर द्यावयाचे असतील त्यानी दरपत्रकातच देण्याचे करावे, दराच्या बाबतीत वाटाघाटी केल्या जाणार नाहीत.

१०) वरील सर्व अटी-शर्तीस अनुसरुन एकत्रित दर देण्याचे करावे.

११) दरपत्रकातील दर मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क संस्थानने राखुन ठेवला आहे.

१२) सन २०१८-१९ या वर्षात संस्थान वाहनांचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) नुतनीकरणाचे काम झालेनंतर व बील सादर केलेनंतर त्या-त्या वेळी बिलाची रक्कम पुरवठाधारकाचे बँक खात्यात RTGS द्वारे आदा केली जाईल.

१३) आपले सिलबंद दरपत्रक **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मु.पो. शिर्डी, ता.राहाता, जि. अहमदनगर** या नांवे दि.०३ /०४/२०१८ अखेर पोहोचतील अशा प्रकारे पाठविण्याचे करावे.

१४) दरपत्रकाचे पाकीटावर "संस्थान वाहनांचे वेग-नियंत्रक (स्पिड गर्व्हनर) नुतनीकरण करणे कामी दरपत्रक" असे ठळक अक्षरात नमुद करावे.

१५) मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

22-03-2018
(श्री गमे)
**प्रशासकिय अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**